
# दिल्ली पालिकेत 'आपची' सत्ता

✔ सुराज्य/नवी दिल्ली

दिल्ली महापालिका निवडणुकीत आम आदमी पक्षानं बाजी मारली. त्यामुळे महापालिकेतील भारतीय जनता पक्षाची १५ वर्षांपासूनची सत्ता खालसा झाली आहे. राज्यापाठोपाठ महापालिकेत सत्ता आणण्याची किमया आपनं करून दाखवली. मात्र मुख्यमंत्री आणि पक्षाचे संयोजक अरविंद केजरीवाल यांच्यासमोर वेगळंच टेन्शन आहे. आपला निवडणुकीत ४२ टक्क्यांच्या आसपास मतं मिळाली. गेल्या विधानसभा निवडणुकीत आपला ५३. ५७ टक्के मिळाली होती. त्यामुळे ११ टक्के मतं कुठे गेली, असा प्रश्न निर्माण झाला आहे.



दिल्ली महापालिका निवडणुकीत आपला ४२. ३५ टक्के, भाजपला ३९. २३ टक्के आणि काँग्रेसला १२. ६ टक्के मतं मिळाली. दोन वर्षांपूर्वी दिल्ली विधानसभेची निवडणूक झाली. त्यावेळी आपला ५३. ५७ टक्के, भाजपला ३८. ५१ टक्के आणि काँग्रेसला ४. २६ टक्के मतदान झालं होतं. दोन वर्षांमधील निवडणुकांमधील मतदानाची तुलना करता, भाजपला मिळालेली मतं तितकीच आहेत.

नेमकी आकडेवारी पाहिल्यास भाजपला दिल्ली विधानसभेच्या तुलनेत पालिकेत ०. ७२ टक्के अधिकम मतदान झालं आहे. मात्र आपला मिळालेल्या मतांमध्ये मोठा फरक दिसून येत आहे. आपला मिळालेली मतं ११. २२ टक्क्यांनी घटली आहेत. काँग्रेसनं विधानसभेच्या तुलनेत पालिका निवडणुकीत जास्त मतं घेतली. विधानसभा निवडणुकीत केवळ ४. २६ टक्के मतदारांनी काँग्रेसला मतदान केलं. मात्र पालिका निवडणुकीत हाच आकडा १२. १६ टक्क्यांवर पोहोचला. म्हणजेच काँग्रेसला झालेलं मतदान ७. ९ टक्के जास्त आहे.

महापालिका निवडणुकीत आपच्या जागा वाढल्या, त्यांची सत्तादेखील आली. मात्र मतदारांची संख्या कमी झाली आहे. मुस्लिमबहुल परिसरात, झोपडपट्ट्यांचं प्रमाण अधिक असलेल्या भागांमध्ये आपच्या अनेक उमेदवारांना पराभवाचा सामना करावा लागला आहे. काही मुस्लिम आणि गरिब मतदार आपपासून दुरावले आहेत. आपसाठी ही धोक्याची घंटा मानली जात आहे.

# संसदेत सीमावादाचे पडसाद; खासदार आक्रमक

✔ सुराज्य/नवी दिल्ली

महाराष्ट्र-कर्नाटक सीमावादावरून गेल्या काही दिवस महाराष्ट्रात तणावाचे वातावरण आहे. या वादाचे पडसाद आज संसदेतही उमटले. राष्ट्रवादी काँग्रेसच्या खासदार सुप्रिया सुळे आणि शिवसेनेच्या ठाकरे गटाचे खासदार अरविंद सावंत यांनी हा मुद्दा लोकसभेत उपस्थित केला. कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांच्या वक्तव्यांमुळे भारतीय राज्यघटनेची पायमल्ली होत असल्याची टीका खासदार सावंत यांनी केली, तर हा सीमावाद म्हणजे महाराष्ट्राविरोधी षडयंत्र असून या प्रश्नावर गृहमंत्री अमित शहा यांनी बोलले पाहिजे, असे खासदार सुप्रिया सुळे यांनी लोकसभेत हा मुद्दा उपस्थित करताना म्हटले. मात्र त्यावर हा दोन राज्यांचा प्रश्न असून त्यावर केंद्र सरकार काय करणार. . ही संसद आहे, अशी भूमिका लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी मांडली. सभापती बिर्ला यांनी केलेल्या विधानावर मविआच्या खासदारांकडून आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

कर्नाटक राज्याचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांनी केलेल्या वक्तव्यांमुळे भारतीय राज्यघटनेची पायमल्ली होत आहे.



सीमावाद हा सर्वोच्च न्यायालयात गेलेला मुद्दा आहे. मात्र, या वादावर कर्नाटकचे मुख्यमंत्री बोम्मई हे आक्षेपार्ह विधाने करत आहेत. महाराष्ट्रातील गाड्यांवर दगडफेक केली जात आहे, असे खासदार विनायक राऊत यांनी म्हटले आहे.

सीमावादावर महाराष्ट्राती मविआच्या खासदारांनी आक्रमक पवित्रा घेतला. या मुद्द्यावरून काही काळ लोकसभेत गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. यात हस्तक्षेप करत सभापती बिर्ला म्हणाले की, 'तुमच्या कोणत्याही वक्तव्याची नोंद घेतली जात नाही. काहीही रेकॉर्ड केले जात नाही. तुम्ही काहीही बोलता, काही रेकॉर्डमध्ये जात नाही आहे. हा संवेदनशील विषय आहे. हा विषय दोन राज्यांचा आहे, त्यात केंद्र सरकार काय करणार, ही संसद आहे.

### गृहमंत्री अमित शहा यांनी यावर बोलले पाहिजे– सुप्रिया सुळे

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी महाराष्ट्र-कर्नाटक सीमावादाचा मुद्दा आज लोकसभेत आक्रमकपणे उपस्थित केला. त्या म्हणाल्या की, कर्नाटक राज्याचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई हे या मुद्द्यावर काहीही बोलत आहेत. काल तर त्यांनी हद्दच केली. महाराष्ट्राचे जे लोक सीमावर जात होते त्यांना मारहाण करण्यात आली आहे. सुप्रिया सुळे पुढे म्हणाल्या की, गेल्या १० दिवसांपासून महाराष्ट्राच्या विरुद्ध षडयंत्र सुरू आहे आणि महाराष्ट्र तोडण्याचा प्रयत्न कर्नाटकचे मुख्यमंत्री बोम्मई करत आहेत. दोन्ही राज्यांमध्ये भाजपचे राज्य आहे. बोम्मई हे महाराष्ट्राच्या विरोधात बोलत आहेत. हे चालणार नाही. यावर गृहमंत्री अमित शहा यांनी बोलले पाहिजे.



## यशात शिक्षणाचे माध्यम अडसर ठरत नाही : गायकवाड

✔ **सुराज्य/माढा** : शिक्षणाचे माध्यम कोणतेही असू द्यात ज्ञान ग्रहण करण्याची आवड जिद्द चिकाटी आणि संयम महत्वाचा असून आत्मविश्वासाने कष्ट केल्यानंतर यश मिळतेच असा ठाम विश्वास नूतन सहाय्यक विक्रीकर निरीक्षक कु स्नेहा संजय गायकवाड हिने व्यक्त केला. प्रारंभी प्रशालेची माजी विद्यार्थिनी या नात्याने कु. स्नेहा संजय गायकवाड हिची महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या परीक्षेतून राज्यात ९ वा क्रमांक (अ. ज. ) मिळवत विक्रीकर निरीक्षक (ढ्ढख) पदी निवड झाल्याबद्दल तिचा सत्कार माढा नगरपंचायतच्या नगराध्यक्षा ड सौ. मिनलताई साठे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी उपनगराध्यक्षा कल्पनाताई जगदाळे, नगरसेवक शहाजी आण्णा साठे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष धैर्यशील भांगे मुख्याध्यापक. नागेश खेडकर जगदाळे फाऊंडेशनचे अध्यक्ष शिवाजी आण्णा जगदाळे, सम्राट उद्योग समूहाचे अध्यक्ष. मधुसूदन गायकवाड, अनिल हणमे व गावातील प्रमुख मान्यवर व गायकवाड परिवारातील सर्व सदस्य, व्यवस्थापन समिती सदस्य, शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रशालेचे मुख्याध्यापक नागेश खेडकर यांनी केले. याप्रसंगी मिनलताई साठे, कल्पनाताई जगदाळे,. शहाजी आण्णा साठे धैर्यशील भांगे यांनी मनोगत व्यक्त करून स्नेहाचे अभिनंदन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन किरण शेलार यांनी केले तर आभार प्रदर्शन श्रीमती. सुरेखा सदावर्ते यांनी केले.

## अन्नछत्र मंडळात श्रीदत्त जयंती उत्सव सोहळा

✔ **सुराज्य/अक्कलकोट** : अवधूत चिंतन श्री गुरुदेवदत्त, सद्गुरू श्री स्वामी समर्थ महाराज की जय. . . ! च्या जयघोषात श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात श्रीदत्त जयंती उत्सव सोहळा बुधवारी सायंकाळी न्यासाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनखाली व प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वखाली हजारो भाविकांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात संपन्न झाला. श्री दत्तमंदिर नव्याने



साकारण्यात आलेले असून या मंदिरास आकर्षक विद्युत रोषणाई व फुलांनी सजविण्यात आलेले आहे. यंदा पु. ना. गाडगीळ या सराफ पेढीने तयार केलेल्या लक्षवेधी चांदीच्या पाळण्याला देखील गुलाबाच्या फुलाने सुशोभित करण्यात आले होते. दरम्यान न्यासाचे मुख्य पुरोहित अप्पु पुजारी यांच्या हस्ते धार्मिक विधी करण्यात आला. याप्रसंगी न्यासाची सहयोगी संस्था असलेल्या हिरकणी महिला बहुउद्देशीय संस्थेच्या अध्यक्षा अलकाताई भोसले, उपाध्यक्षा रत्नमाला मचाले, सचिवा अर्पिताराजे भोसले, कु. तेजस्वी भोसले, गीतांजली अमोल शिंदे, नंदा चव्हाण, माजी नगराध्यक्षा अनिता खोबरे, विशाला अभय दिवाणजी, निंगुताई हिंडोळे, खजिनदार स्मिता कदम, डॉ. असावरी पेडगावकर, कोमल क्षीरसागर, अंजना भोसले, सुवर्णा घाडगे, पल्लवी नवले, क्रांती वाकडे, कविता वाकडे, स्वप्ना माने, वैशाली यादव, रेखा पवार, पल्लवी कदम, स्वाती निकम, रेखा पवार, राजश्री माने, छाया पवार, अंजना भोसले, हर्षदा पवार यांच्यासह मंडळाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, सचिव शामराव मोरे, मनोज निकम, अरविंद शिंदे, सनी सोनटक्के, रमेश केत, संदीप सुरवसे, वैभव नवले, अभियंता अमित थोरात, पिंटू साठे, प्रवीण घाडगे, विजय माने, रोहित खोबरे, विराग माणिकशेट्टी, राहुल इंडे, मल्लिकार्जुन बिराजदार, दत्ता माने, श्रीनिवास गवंडी, परशुराम बिराजदार, सिध्दाराम कल्याणी, एस. के. स्वामी, बाळासाहेब पोळ, सतिश महिंद्रकर, गोरखनाथ माळी, प्रा. मनोज जगताप, मनोज इंगोले, सुमित कल्याणी, खाजप्पा गायकवाड, नामा भोसले, सोमकांत कुलकर्णी, शहाजीबापू यादव, बाळासाहेब घाडगे, महांतेश स्वामी, समर्थ घाडगे, देवा हंजगे, संभाजीराव पवार, प्रसाद हुल्ले, बाबुशा महिंद्रकर रमेश हेगडे, राजेश काटकर, राजू पवार, गोविंदराव शिंदे, रवी श्रीमान, काशिनाथ वाले, वैभव मोरे, सौरभ मोरे, फहीम पिरजादे, बलभीम पवार, प्रीतीश किलजे, किरण साठे, गणेश लांडगे यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अप्पू पुजारी व बाळासाहेब घाडगे यांनी केले.

# माढा शहर प्रारूप विकास आराखड्यातील चुकीच्या आरक्षणात बदल करण्याची मागणी

## १५ डिसेंबरपर्यंत हरकती नोंदवण्याचे आवाहन

✔ सुराज्य/माढा

शहरासाठी नगरविकास विभागाकडून तयार करण्यात आलेल्या प्रारूप विकास आराखड्यामध्ये चुकिच्या पद्धतीने आरक्षणे टाकण्यात आली असून यामध्ये बदल करण्याची मागणी नगरविकास विभागाचे सोलापूरचे अधिकारी कल्याण जाधव यांचेकडे केल्याची माहिती नगराध्यक्षा ॲड मिनलताई साठे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

शहराच्या विकासाच्या दृष्टीने आणि भविष्यकालीन शहराच्या गरजा पहाता विकास आराखडा गरजेचा आहे. मात्र शहराच्या भौगोलिक परिस्थितीचा आणि शासकीय जागांच्या विचार न करता अनेक आरक्षणे टाकण्यात आली असल्याने शहरातील नागरिकांच्या वैयक्तिक मालमत्ता यामुळे बाधित होणार आहेत.

माढा शहरास पाणीपुरवठा येवती तलावातून होतो. यामुळे जलशुध्दीकरण केंद्रांचे आरक्षण हे माढा शेटफळ रस्त्यावर आवश्यक असताना ते माढा वैराग रस्त्यालगत आश्रमशाळेजवळ टाकण्यात आले आहे. याचबरोबर कचरा डेपोसाठी जाधववाडी गावानजीकच्या ५ हेक्टर जागेवरती लाखो रूपये खर्चून विकास कामे सुरू आहेत. मात्र डेपोसाठीचे आरक्षण गालीशाबाबा तलावाजवळ पडले आहे. या दोन्ही आरक्षणामुळे तलाव आणि जलशुध्दीकरण यंत्रणा बाधित होणार आहे.

पार्किंग झोनही शहरातील मध्यभागी आणि सर्व शासकिय कार्यालयापासून एक ते दीड किमी अंतरावर पडले असून याठिकाणी पुरातत्व विभागाच्या अखत्यारीत असणारा निंबाळकर राजांचा किल्ला आहे. शहरातील राज्य मार्ग हे ४५ मीटर चे धरल्याने सद्यस्थितीत असलेल्या रस्त्यालगतच्या इमारती व शॉपींग कॉम्पलेक्स बाधित होणार आहेत. यामुळे संपूर्ण शहरातील व्यापार उद्धवस्त होणार आहे. शहराच्या पश्चिम ते पूर्व या नैसर्गिक उताराचा विचार न करता सांडपाणी व्यवस्थापनाचे आरक्षण हे विरूध्द दिशेला टाकण्यात आले आहे. शासकिय जागेवर विविध प्रकारचे आरक्षण न टाकता खाजगी जागावरती टाकले गेल्याने अनेकांना याचा फटका बसणार आहे.

शहरातील यलोझोन क्षेत्रही चुकिच्या पद्धतीने आरक्षित करण्यात आले असून उद्यान नगरपंचायतव कार्यालय कत्तलखाना आदिसह अनेक चुकीची आरक्षणे टाकण्यात आली आहेत.

या सर्व गोष्टी जिल्हा कार्यालयाच्या लक्षात आणून दिल्या असून बदल करण्याची मागणी नुकतीच नगराध्यक्षा ॲड मिनलताई साठे काँग्रेस नेते दादासाहेब साठे उपनगराध्यक्षा कल्पनांताई जगदाळे बांधकाम समिती सभापती अरूण कदम नगरसेवक अजिनाथ अप्पा माळी नितीन साठे गितांजली देशमुख रविंद्र कथले आदिसह शिष्टमंडळाने केली आहे.

शहरासाठी तयार करण्यात आलेला प्रारूप विकास आराखडा हा शहराच्या विकासास पोषक नसून यामध्ये मोठे बदल आवश्यक आहेत. आराखडा तयार झाला म्हणजे अंतिम झाले असे नसून याबाबतच्या लेखी हरकती योग्य पद्धतीने नगरपंचायत कार्यालयाकडे द्याव्यात. यासाठी लवकरच एक मिटींग घेत असून आपल्या पुराव्यानिशी योग्य हरकती नागरिकांनी सादर कराव्यात. जिल्हा प्रशासनाकडे प्रत्यक्ष भौगोलिक परिस्थिती पाहून निर्णय घेण्याची विनंती केली आहे. यावरती जर सकारात्मक निर्णय नाही झाला तर आम्ही सर्वजण नागरिकांच्या सोबत असल्याचे ॲड मिनलताई साठे यांनी सांगितले. ज्या खाजगी जागा आरक्षित होणार आहेत. त्याचा मोबदला हा नगरपंचायतीच्या नफा फंडातून द्यावयाचा असल्याचे समजते. याचा अर्थ सध्याच्या बाजारभावाप्रमाणे जरी मोबदला द्यायचा म्हटलं तरी नगरपंचायतची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची आहे. यामुळे खाजगी जागेवर जागामालक अथवा नगरपंचायत कोणतीही विकासकामे करू शकत नाहीत. मात्र विकासापासून वंचित राहण्याची परिस्थिती मात्र उद्भवू शकते.

> जिल्हा प्रशासनाने भौगोलिक परिस्थिती पाहून आणि सर्वांना विश्वासात घेऊन आरक्षणाच्या बाबतीत निर्णय घ्यावा. सत्ताधारी व विरोधक आणि नागरिक सर्वजण विकासासोबत आहेत. मात्र या माध्यमातून अनैसर्गिक आरक्षणाच्या माध्यमातून विकासाला खीळ बसतानाच नागरिकांच्या खाजगी मालमत्ता आणि शहरातील व्यापारपेठा बाधित होणार आहेत. यामुळे जिल्हा प्रशासनाने याचा विचार करून निर्णय घ्यावा.
>
> – **दादासाहेब साठे**


# माढ्यातील शिंगेवाडी सरपंचपदासह एकूण ९ सदस्य बिनविरोध होणार

## सरपंचपदासाठी १७ तर सदस्यांसाठी १५८ जण निवडणूक रिंगणात

✔ सुराज्य/माढा

माढा तालुक्यातील आठ ग्रामपंचायतीच्या निवडणूकिसाठी आज अर्ज माघार घेण्याच्या दिवशी सरपंचपदाच्या ३५ वैध अर्जापैकी १८ उमेदवारांनी तर ग्रामपंचायत सदस्यांच्या ३०७ वैध अर्जापैकी १४९ जणांनी आपले उमेदवारी अर्ज मागे घेतल्याने सरपंचपदासाठी १७ जण तर सदस्यांसाठी १५८ जण रिंगणात उभे ठाकल्याचे स्पष्ट झाले आहे.

दरम्यान शिंगेवाडी ग्रामपंचायतीच्या सरपंचपदासाठी एकच अर्ज राहिल्याने सरपंच बिनविरोध निवडले जाणार आहेत. याचवेळी येथील ४ सदस्य आणि रोपळे खुर्द येथील ५ सदस्य बिनविरोध होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.



तालुक्यातील ८ ग्रामपंचायतीसाठी १८ डिसेंबर रोजी मतदान होत असून आज बुधवार अखेर अर्ज माघार घेण्याच्या शेवटच्या दिवस अखेर चौभेपिंपरी व चिंचोली येथील सरपंचपदासाठी तिरंगी तर तालुक्यातील महत्वाच्या व संवेदनशील समजल्या जाणार्या भोसरेसह दारफळ रोपळे भेंड घाटणे येथे सरपंचपदासाठी दुरंगी लढत होत आहे. भोसरे ग्रामपंचायतीच्या सदस्यांसाठी सर्वाधिक ४३ जण निवडणूक रिंगणात आहेत. तर रोपळे येथे सर्वात कमी ४ जण निवडणूक रिंगणात आहेत. येऊ घातलेल्या १८ डिसेंबर रोजीच्या ग्रामपंचायत निवडणूकिसाठी सर्व प्रशासकिय तयारी पूर्ण झाली असून आवश्यक ती निवडणूक यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली आहे. निवडणूकिसाठी मतदान कर्मचारी व अधिकारी यांच्या नेमणुका करण्यात आल्या असून ८ डिसेंबर व १४ डिसेंबर रोजी प्रशिक्षण आयोजित केल्याचे महसूल प्रशासनाच्या वतीने सांगण्यात आले.

# उत्तर मधील १२ ग्रामपंचायतीच्या सरपंच ४७, सद्स्य ३११ रिंगणात

✔ **सुराज्य/उत्तर सोलापूर** : उत्तर तालुक्यातील १२ ग्रामपंचायतिच्या माघार घेण्याच्या अखेरच्या दिवशी दिवशी सरपंच पदासाठी ४७ व सदस्य पदासाठी ३११ अर्ज राहिले असून १९० इच्छुकांनी माघार घेतले आहेत. सरपंच पदासाठी-, सद्स्य पदासाठी उमेदवार आता आपले नशीब अजमावणार आहेत. रिंगणात उभे असलेले सरपंच व सदस्य पुढील प्रमाणे(कंसात सदस्य)-

- अकोलेकाटी- ६ (२२), दारफळ गावडी-१(१८), डोनगाव/ भाटेवडी-४(२५), कारंबा-३(२५), कवठे-४(३८), कौठाळी- ३(३१), मार्डी-३(२७), नंदुर/समशापुर-३(१५), नरोटेवाडी-४(१७), पाकणी-७(३९), राणमसले-६(४२), शिवणी-२(१२). असे एकूण १२ सरपंच पदासाठी ४७ व सद्स्य पदासाठी ३११ उमेदवार आपले नशीब अजमावणार आहेत. ३९ उमेदवार बिनविरोध झाले आहेत. १८ नोव्हेंबर मतदान व २०रोजी मतमोजणी असून आहे. मोठ्या गावात तिरंगी, लहान सद्स्य संख्या असलेल्या ग्रामपंचायत मध्ये तिरंगी व चौरंगी लढत पाहायला मिळणार आहे. सरपंच निवड जनतेतून असल्याने मतदारांची मनधरणी करणे अवघड असल्याचे उमेदवारातून बोलले जात आहे.

**१९० सदस्यांनी घेतली माघार**

# 'शोलापूर को मैं जरूर आऊंगा' : सिनेअभिनेते सनी देओल


✔ सुराज्य/सोलापूर

'शोलापूर को मैं जरूर आऊंगा' हा चित्रपटातील नव्हे तर वास्तव संवाद आहे, हिंदी सिनेसृष्टीचे सुप्रसिध्द अभिनेते सनी देओल यांचा ! यावेळी त्यांनी सोलापूरला आल्याच्या आठवणीला उजाळा देताना, मला सोलापूरच्या सिने रसिकांच्या भेटीला लवकरच सोलापूरला येईन, असा विश्वासही त्यांनी त्या भेटीत व्यक्त केला.

निमित्त होते, गदर - २ या हिंदी चित्रपटाच्या चित्रीकरण सेटवरील भेटीचे. . . 'गदर ! एक प्रेमकथा' हा चित्रपट तमाम सिनेरसिकांच्या मनात घर करून आहे. ज्या चित्रपटाच्या प्रेमकथेला अभिनेते सनी देओल अन् अभिनेत्री अमिशा पटेल या जोडीने आपल्या अभिनयाने रंग भरला होता. ती प्रेमकथा सिनेरसिकांच्या स्मृतिपटलावर आजही कायम आहे. त्या प्रेमकथेला दिग्दर्शक अनिल शर्मा, गदर - २ च्या निमित्ताने सिनेरसिकांच्या भेटीला पुन्हश्च येण्याच्या तयारीला लागले आहेत. गदर-२ चं चित्रीकरण रात्रीचाही दिवस करून सुरु आहे.



गदर-एक प्रेम कथा २००१ रोजी प्रदर्शित झाला. त्याचाच भाग म्हणून गदर-२ या चित्रपटाचे




चित्रीकरण सुरू झाले आहे. लखनौ, मुंबई आणि महाराष्ट्रातील अहमदनगर येथे चित्रीकरण होणार आहे. त्यातील काही प्रसंगाचे चित्रीकरण अहमदनगर शहरापासून जवळपास १० कि. मी. अंतरावर असलेल्या मिलीटरी कॅम्पजवळ सुरू होतं. त्या चित्रीकरणाच्या स्थळावर शंभर-दोनशे जवानांसह ट्रक उडविण्याचा सीन होता. जवानांसह दोन ट्रक उडविण्याचे चित्रीकरण एकदाचे पूर्ण झाले. या प्रसंगाला चित्रीत करण्यासाठी रविवारी रात्री सतत १२ तास शुटींग झाली. मिलीटरी ट्रेनिंग (प्रशिक्षणार्थी) मधील मुले चित्रपटात सहकलाकार म्हणून सहभागी झाले होते. शूट दरम्यान ५ ते ८ हजार पब्लिक उपस्थित होती. तसेच त्यांच्या लकूवर सोलापुरातील चाहाते 'फिदा' झाले होते.

अशा प्रसंगात सनी देओल यांच्या भेटीसाठी सोलापूरहून फॅन्स आल्याचे समजताच त्यांनी सोलापुरकरांनाही त्यांनी वेळ देत संवाद साधला. यावेळी गदर - एक प्रेमकथेचाच लूक, तोच रुबाब आणि तोच पोशाख पहायला मिळाला. आवाजातही तोच दमदारपणा कायम असल्याची अनुभूती झाली.

### आप लोगोंने कुछ खाया-पिया या नही ?

सोलापूरहून आलेल्या चाहत्यांच्या भेटी प्रसंगी, 'आपको मीलके बहुत अच्छा लगा, आप लोगोंने कुछ खाया-पिया या नहीं, असे विचारले. शेवटी त्यांनी चाहत्यांच्या चमूसोबत चहा घेतला. त्यावेळी चाहत्यांकडून सनी देओल यांना 'गदर-२' ची ट्रॉफी भेट देण्यात आली. सोलापूरकरांच्या प्रेमामुळे भारावलेल्या अभिनेते सनी देओल यांनी 'शोलापूर को मैं जरुर आऊंगा' असा विश्वास ही आवर्जून व्यक्त केला.

### सोलापूरकरांचं माझ्यावर मनस्वी प्रेम

सोलापूर भेटीची आठवण सांगताना सनी देओल म्हणाले, मी २००९ साली सोलापूरला आलो होतो, त्यावेळी शरद बनसोडे यांनी निमंत्रीत केलं होतं. सोलापूरकरांचं माझ्यावर मनस्वी प्रेम असल्याचे जाणवले हे सांगताना, दिवस-रात्र मेहनत करुन आपल्यासारख्या चाहत्यांसोबत वेळ घालवतो, यातच मला आनंद आहे, असेही अभिनेते सनी देओल यांनी चाहत्यांची आपुलकीने चौकशी करताना सांगितले.